**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४**

webside www.sscboardkolhapur.in Chairman 2690829 [O] , Secretary 2691405 [O]PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 FAX : [0231] 2690758 E-Mail: divsec.kop@ gmail.com

क्र. कोविमं/शाखा-१२ वी परीक्षा/ 2418
कोल्हापूर - ४१६ ००४.
दिनांक- ०७/१२/२०१७

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/ कोल्हापूर

विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) फेब्रुवारी - मार्च २०१९ नियमित, पुनर्परिक्षार्थी,तुरळक विषय श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब /अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत ...

मंडळ विनियम १९७७ नियम क्र.९३ अन्वये फेब्रु-मार्च २०१९ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ .१२ वी ) परीक्षेस नियमित ,पुनर्परिक्षार्थी ,तुरळक विषय ,श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन परीक्षेची आवेदनपत्र स्किारण्याची मुदत संपल्यावरही (१) श्रेणी /तोंडी/ प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाच्या कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क , (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे , त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रति दिन रु .१००/- विशेष अतिविलंब शुल्क तद्नंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत रु .२००/- प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी-२०११(१८५/११)उमाशि-२ दिनांक ०२ फेब्रु २०१२ च्या पत्रानुसार) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत .

विलंब शुल्कानंतरची अति विलंब शुल्काची आवेदनपत्रे ही कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahssboard.maharashtra.gov.in या किंवा www.mahahsscboard.in संकेत स्थळावर भरावयाची आहेत . त्यानंतर विद्यार्थी व प्राचार्य / मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची मूळ प्रत (Print Out) अतिविलंब शुल्कासह भरलेल्या रक्कमेचे चलन व यादी दुसऱ्या दिवशी (शासकीय सुट्टी वगळता ) मंडळाकडे सादर करावीत. मात्र त्यानंतर कनिष्ठ महाविद्यालय आवेदनपत्रे मंडळाकडे जमा करण्यास येतील अशा कनिष्ठ महाविद्यालयांना नियमानुसार आवेदनपत्रे जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क घेण्यात यावे .

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/- प्रतिदिनी , प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिममुदत (रु.१००/- प्रतिदिनी प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब मुदत (रु.२००/- प्रतिदिनी , प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा | शनिवार दि १५/१२/२०१८ ते मंगळवार दि ०१/०१/२०१९ | बुधवार दि ०२/०१/२०१९ ते बुधवार दि १६/०१/२०१९ | गुरुवार दि १७/०१/२०१९ ते गुरुवार दि ३१/०१/२०१९ |

संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी पुर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहित प्रपत्रांसह अतिविलंब /विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्र स्विकारावीत मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल . **तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे.** ही बाब कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावे व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी .

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर

Rao general